जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 JUN 2021
पुढारी

# शाहू जयंतीनिमित्त डॉ. जयसिंगराव पवार यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे शनिवारी (दि. २६) राजर्षी शाहू जयंतीच्या निमित्ताने ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता' विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये २६ जून रोजी सकाळी साडेदहा वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात येईल. अभिवादन कार्यक्रमानंतर सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' (www.youtube.com/c/ShivVarta) या यू ट्यूब वाहिनीवरून डॉ. पवार यांचे व्याख्यान होईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JUN 2021
सकाळ

# राजर्षी शाहू जयंती यंदाही साधेपणाने

## व्याख्यानासह विविध उपक्रम ऑनलाईनच

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. २४ : लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची शनिवारी (ता. २६) होणारी जयंती साधेपणानेच साजरी होणार आहे. मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत प्रतिमापूजन होणार असून व्याख्याने व इतर उपक्रम ऑनलाईन पद्धतीनेच होणार आहेत. दरम्यान, दसरा चौकातील राजर्षी शाहूंचा पुतळा व परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला आहे. राजर्षी शाहू मेमोरियल ट्रस्टच्या वतीने होणारा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम यंदाही रद्द करण्यात आला आहे. ट्रस्टतर्फे केवळ पुतळ्याला अभिवादनाचा कार्यक्रम होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातर्फे शनिवारी (ता. २६) राजर्षी शाहू जयंतीच्या निमित्ताने ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले आहे.

पान ११ वर »

## राजर्षी शाहू जयंती यंदाही साधेपणाने

» पान १ वरून

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित असतील.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी साडेदहा वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात येईल. अभिवादन कार्यक्रमानंतर सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' यूट्यूब वाहिनीवरून डॉ. जयसिंगराव पवार यांचे व्याख्यान होईल. व्याख्यानाचा शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.